सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

# जमीन-दावे

## सन १८३१ चा मुंबई विनियम क्रमांक एक

( दिनांक १६ नोव्हेंबर, २००६ पर्यंत सुधारलेला )

# LAND-SUITS

## THE BOMBAY REGULATION I OF 1831

**(As modified upto 16th November, 2006)**

[व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-६ यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित.]

२००६

( किंमत : रुपये ३.७० )

वि (एच) १२५६

## [सन १८३१ चा मुंबई विनियम क्रमांक १]

ज्या दाव्यात विशेष अधिकार असलेल्या वर्गातील व्यक्तीचा संबंध आहे व ज्या दाव्याचा निर्णय आता जमीन-महसुलाच्या जिल्हाधिकाऱ्यांना करता येतो अशा दाव्यांच्या बाबतीत सन १८२७ चा विनियम २९, कलम ४, याच्या तरतुदीअन्वये काम करणाऱ्या एजंटाला क्षेत्राधिकार देण्याबाबत विनियम.

अनुक्रमणिका

उद्देशिका


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १ | जमीन, जमिनीचा खंड व उत्पन्न यासंबंधीचे एजंटाने निर्णय करण्याजोगे दावे. .. | २ |
| २ | निरसित. .. | २ |




वि (एच) १२५६

# जमीन-दावे

## सन १८३१ चा मुंबई विनियम क्रमांक १[1]

[५ जानेवारी, १८३१]

हा विनियम सन १८७३ चा अधिनियम १२ या अन्वये अंशतः निरसित करण्यात आला.

सन १८३१ चा मुंबई विनियम १६ या अन्वये तो सुधारण्यात आला.

सन १८४२ चा अधिनियम १३ या अन्वये तो सुधारण्यात आला.

भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश या अन्वये अनुकूलन व रूपभेद करण्यात आले.

विधि अनुकूलन आदेश, १९५० या अन्वये अनुकूलन व रूपभेद करण्यात आले.

**ज्या दाव्यात विशेष अधिकार असलेल्या वर्गातील व्यक्तींचा संबंध आहे व ज्या दाव्यांचा निर्णय आता जमीन-महसुलाच्या जिल्हाधिकाऱ्यांना करता येतो अशा दाव्यांच्या बाबतीत [3]सन १८२७ चा विनियम २९, कलम ४, याच्या तरतुदींअन्वये काम करणाऱ्या [2][प्रांतिक सरकारच्या] एजंटाला क्षेत्राधिकार देण्याबाबत विनियम.**

**उद्देशिका.** **ज्याअर्थी,** जमीन, जमिनीचा खंड व तिचे उत्पन्न यासंबंधीच्या ज्या दाव्यात [4][****] [3]सन १८२७ चा विनियम २९ याअन्वये ठरविलेला विशेष अधिकार असलेल्या वर्गातील व्यक्तींचा संबंध येतो त्या दाव्यांच्या बाबतीत उक्त विनियमाचे कलम ४ याच्या तरतुदींअन्वये काम करणाऱ्या [2][प्रांतिक सरकारच्या] एजंटास क्षेत्राधिकार देणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** पुढीलप्रमाणे नियम करण्यात आले आहेत :—

---

१. विवक्षित प्रदेशात हा विनियम लागू करण्याकरिता, सन १८६३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३, कलम ४ व सन १८६६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १४, कलम ३ पहा.

२. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. सन १८७३ चा निरसन अधिनियम (१८७३ चा १२) याद्वारे अनुक्रमे हे शब्द व मजकूर निरसित करण्यात आला.

जमीन, जमिनीचा खंड व उत्पन्न यासंबंधीचे एजंटाने निर्णय करण्याजोगे दावे.

**१.** जमीन, जमिनीचा खंड व तिचे उत्पन्न यासंबंधीच्या ज्या दाव्यात [२][****] [१]सन १८२७ चा विनियम २९ याअन्वये ठरविलेल्या विशेष अधिकार असलेल्या वर्गातील व्यक्तींचा संबंध येतो त्या दाव्यांचा [२][****] निर्णय यापुढे, [१]सन १८२७ चा विनियम २९, कलम ४ या अन्वये आणि इतर बाबतीत त्याच्या मार्गदर्शनासाठी विहित केलेल्या नियमांन्वये दिलेल्या अधिकारानुसार काम करणाऱ्या [३][[४][राज्य] सरकारच्या]] [५]एजंटालाच फक्त करता येईल.

**दोन.** [अनिर्णित दावे]. सन १८७३ चा अधिनियम १२ या अन्वये निरसित करण्यात आले.

---

१. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखला करण्यात आला.
२. सन १८७३ चा निरसन अधिनियम (१८७३ चा १२) याद्वारे अनुक्रमे हे शब्द व मजकूर निरसित करण्यात आला.
३. प्रतिवादांकरिता--सन १८३१ चा मुंबई विनियम क्रमांक १६, कलम २ पहा.
४. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
५. उर्वरित मजकुराकरिता सन १८३१ चा मुंबई विनियम १६, कलम १ पहा.
सन १८४८ चा अधिनियम क्रमांक १३, कलम ६ पहा.
सन १८७९ चा मुंबई जमीन महसूल संहिता (१८७९ चा मुंबई ६) पहा.

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-६.